# थोडक्यात

## एकांकिका स्पर्धेचे आयोजन

**मुंबई :** महाराष्ट्र सायबर पोलीस, क्विक हील फाऊंडेशन आणि थिएटर अकॅडमी यांच्यावतीने थिएटरच्या माध्यमातून सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी 'साय–फाय करंडक' या एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. 'साय–फाय करंडक'साठी महाराष्ट्र राज्यातून प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत महाविद्यालये, स्वतंत्र गट आणि थिएटर संस्थांकडून प्रवेश प्रवेशिका दि. १५ नोव्हेंबर, २०१८ पर्यंत स्वीकारण्यात येतील. सहभागी टीम नाट्य वर्तुळातील नोंदणीकृत गट असणे अनिवार्य आहे. 'साय–फाय करंडक २०१८'मध्ये नोंदणी करण्यासाठी ८३९००४१३९ / ९६५७४४२९५७ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.